N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** वैजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0436 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**29/06/2024 00:58

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 28/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/06/2024
**Time From (वेळेपासून):** 15:18 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/06/2024 **Time (वेळ):** 00:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/06/2024 00:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय वैजापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ज्ञानेश्वर कचरु त्रिभुवन

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उंदीरवाडी पोस्ट राहेगाव,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उंदीरवाडी पोस्ट राहेगाव,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अर्जुन गंगाधर खरबडे | | | 1. दारेभळ ता वसमत जि हिंगोली, हमु C/O घर न 2-S No -188 ,म्हसोबानगर, हर्सुल , छत्रपती संभाजी नगर ,वैजापूर, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम | 10,000.00 |

Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

10,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी ज्ञानेश्वर कचरु त्रिभुवन वय-34 वर्षे व्यवसाय- शेती रा. उंदीरवाडी पोस्ट राहेगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर, ई-मेल tribhuaundnyaneshwar@gmail.com मो.नं. 8788833814

मी दिनांक 19/06/2024 रोजी पोलीस निरीक्षक, हरिदास डोळे ,लाचलुपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दोन पंचासमक्ष तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी राहात असुन माझी पत्नी सौ. रेखा ज्ञानेश्वर त्रिभुवन या ग्रुपग्रामपंचायत राहेगाव येथील ग्रामपंचायत सदस्या असुन सध्या ग्रुपग्रामपंचायत राहेगाव येथे सरपंच म्हणुन रुपाली कदम व ग्रामसेवक श्री. अर्जुन गंगाधर खरबडे हे आहेत.

मी व माझे सोबत गावातील इतर 06 लाभार्थी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजने अंतर्गत सन-2023-24 या आर्थिक वर्षातील गायगोठा मिळणेसाठी सुमारे एक वर्षापुर्वी अर्ज केला होता. त्यावरुन सदर गायगोठा प्रकरण पंचायत समिती वैजापुर यांचेकडुन जुलै-2023 मध्ये मंजुर झालेले आहे. सदर गायगोठा मंजुर झालेनंतर आम्ही इंजिनियर कडुन इस्टीमेट तयार करुन घेतले व त्या इस्टीमेट प्रमाणे आम्ही गायगोठा स्वत: खर्च करुन बांधुन घेतला. सदर गायगोठा कामाची मोजमाप पुस्तिका (एम.बी) तयार करुन इंजिनियर ने दिलेल्या इस्टीमेट प्रमाणे 77,424/- रुपयांचे मोजमाप पुस्तिका तयार करुन त्यासोबत झालेल्या कामांची बीले जोडुन सदरची मोजमाप पुस्तिका (एम.बी) तयार केली होती. माझे सोबत आमचे गावातील 1) श्री. श्रीराम सिताराम बडक 2) श्री. गोपाल राजाराम कदम 3) श्री. दौलत रावसाहेब कदम 4) श्री. गोपीनाथ रामचंद्र बडक 5) श्री. मोतीलाल कारभारी झाल्टे 6) श्री. रामकिसन जनार्धन कदम यांनी देखील त्यांचे मंजुर गायगोठ्याचे मोजमाप पुस्तिका (एम. बी) तयार करुन त्यासोबत झालेल्या कामांची बीले जोडुन माझी पत्नी ग्रुपग्रामपंचायत राहेगाव येथील सदस्य असल्याने सदरच्या मोजमाप पुस्तिका(एम.बी) सरपंच व ग्रामसेवक यांची सही घेण्याकरिता माझेकडे दिल्या होत्या. सदर मोजमाप पुस्तिकेवर मी सरपंचाच्या सह्या घेतल्या व त्यानंतर ग्रामसेवक यांची सही घेणे बाकी असल्याने तसेच श्री. अर्जुन खरबडे, यांचेकडे इतर 02 ग्रामपंचायतीचा कार्यभार असल्याने ते अधुन मधुन राहेगाव येथे येत असल्याने मी दिनांक 14/06/2024 रोजी सकाळी 10 वाजेच्या सुमारास त्यांचे मोबाईल क्र. 7588269400 वर माझे वरील फोन नंबरवरुन फोन केला असता त्यांनी मी छत्रपती संभाजीनगर येथे असुन तुम्ही मला हर्सुल टी पॉईन्ट, छत्रपती संभाजीनगर येथे येऊन भेटा मी सह्या करुन देतो. म्हणुन मी माझे व इतर 6 लाभार्थीचे मोजमाप पुस्तिका (एम.बी) वर सही घेण्यासाठी दुपारी चार वाजेच्या सुमारास हर्सुल टी पॉईन्ट जवळील एका ऑफिसच्या मोकळ्या पटांगणात झाडाखाली ग्रामसेवक श्री. खरबडे यांची भेट घेतली असता त्यांनी मी तुमच्या मोजमाप पुस्तिकेवर सह्या करतो पण मला प्रत्येकी 5,000/- रुपये प्रमाणे तुमच्यासह एकुण 07 जणांचे 35,000/- रुपये द्यावे लागतील. मी ग्रामसेवक यांना इतर लाभार्थी गरीब असुन एवढे पैसे देणार नाही. त्यावेळी त्यांनी प्रत्येकी 3,000/- रुपये मोजमाप पुस्तिका (एम.बी.) प्रमाणे एकुण सात एम.बी.चे 21,000/- रुपये करा असे बोलुन हे पैसे दिले तरच मी तुमचे पुढचे काम करणार करील पैसे दिले नाहीतर यापुढे तुमचे काम करणार नाही असे म्हणाले. मी जर ग्रामसेवक श्री. खरबडे यांना पैसे दिले नाहीतर ते माझे यापुढे कोणतेही काम करणार नाही म्हणुन मी नाईलाजास्तव हो म्हणुन निघुन आलो आहे.

माझा ग्रुपग्रामपंचायत कार्यालय, राहेगाव येथील ग्रामसेवक श्री. अर्जुन खरबडे यांच्याशी कोणताही पैशाचा देण्या-घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच माझा त्यांच्याशी कोणताही भांडणतंटा अगर वैर दुष्मनी नाही. माझी ग्रुपग्रामपंचायत कार्यालय, राहेगाव येथील ग्रामसेवक श्री. अर्जुन खरबडे यांना लाच देण्याची इच्छा नाही.

मला ग्रामसेवक श्री. अर्जुन खरबडे यांनी चार-पाच दिवसांनी भेटण्यासाठी बोलावले असुन मी उद्या दिनांक

20/06/2024 रोजी ग्रामसेवक श्री. अर्जुन खरबडे यांना भेटण्यास जाणार आहे. त्यावेळी ग्रामसेवक श्री. अर्जुन खरबडे हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजने अंतर्गत सन-2023-24 या आर्थिक वर्षातील माझे व इतर 06 लाभार्थी यांचे मंजुर गायगोठ्याचे मोजमाप पुस्तिकेवर सह्या केल्याचा मोबदला म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी करुन स्वत: अगर इतरांमार्फत लाच स्वीकारतील त्यावेळी त्यांना लाचेच्या रकमेसह पकडून त्यांच्यावर योग्य ती कायदेशिर कारवाई करावा हि विनंती वगैरे मजकुराची तक्रार दिल्याने पोलिस निरीक्षक श्री डोळे यांनी दोन शासकीय पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरविले.
त्यानुसार दोन पंचाससह व सापळा पथकासह लाचमागणी पडताळणी कामी दिनांक 20/6/2024 रोजी ग्रामसेवक श्री.अर्जुन खरबडे यांची लासुर गंगापुर रोड येथील हॉटेल वनश्री येथे पंचासमक्ष शासकीय व्हाईस रेकॉर्डरसह लाचमागणी पडताळणी केली असता केली असता श्री.खरबडे ग्रामसेवक, ग्रुपग्रामपंचायत राहेगाव यांनी तक्रारदार यांना जेवढयांचे आले तेवढयांचे घ्या भो..किती किती दिले..किती किती दिले तेव्हा श्री. खरबडे यांना मी म्हणालो की, तुम्ही सांगा त्यावर श्री. खरबडे म्हणाले की, मी तर तुम्हाला पाच-पाच सांगा म्हटलं.. मंग तीन तीन वर येतान म्हणलं..नाही तर चार - चार वर येतान..एखांदा गोपाळ सारखा म्हणला कि दोनच घ्या त्यावर तक्रारदार म्हणाले की, सात जण आहे ते त्यावर श्री.खरबडे म्हणाले सात त्रीक एकवीस.. तुम्ही स्वखुशीनं सायबाला देत असाल तर दया बा साहेब कमी पडु देतात का... असे म्हणुन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजने अंतर्गत सन-2023-24 या आर्थिक वर्षातील माझे व इतर 06 लाभार्थी असे एकुण 7 लाभार्थीचे मंजुर गायगोठ्याचे मोजमाप पुस्तिकेवर सह्या केल्याचा मोबदला म्हणुन सात त्रिक एकवीस असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यावरुन मी श्री. खरबडे यांना दहा देतो असे म्हणालो असता

त्यांनी व्यवस्था करा असे संबोधुन लाच स्विकारण्याचे मान्य केले.
त्यानंतर मी पोलीस निरीक्षक श्री.डोळे यांना कळविले की, आज दिनांक 28/6/2024 रोजी मी ग्रामसेवक श्री. खरबडे यांची पंचायत समिती कार्यालय वैजापुर येथे भेट घेवून त्यांनी मागणी केलेले 10,000/- रुपये देणार आहे. त्याकरिता तुम्ही तुमचे पथकासह वैजापुर येथे हजर या. असे कळविल्याने पो.नि.डोळे हे शासकीय पंच व त्यांचे पथकासह पंचायत समिती कार्यालय वैजापुर जवळील सुरक्षीत ठिकाणी हजर आले. त्यानंतर सर्वानुमते सापळा कारवाई करण्याचे ठरवुन पंचासमक्ष 10,000/-रुपये लाचेच्या रकमेस पावडर (ऍन्थ्रॉसीन पावडर) लावुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पंच क्र.1 यांच्यासह माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे माझ्या खाजगी मोटार सायकलने श्री खरबडे यांचे भेटी करता पंचायत समिती कार्यालय वैजापुर येथे जाऊन श्री. खरबडे यांची भेट घेवुन त्यांचेसोबत चर्चा केली. त्यानंतर श्री. खरबडे हे मला पंचायत समिती वैजापूर कार्यालयाचे समोरील रोडच्या पलीकडच्या श्री.साईयश पान मंदीर या टपरीचे बाजुला घेवुन गेले तेव्हा मी श्री. खरबडे यांना म्हणालो की, अरे घ्या खिशात घालुन तेव्हा श्री. खरबडे हे म्हणाले की, तुम्हीच घाला माझ्या खिशात असे म्हणताच म्हणजे मी तुमच्या खिशात घालु का ? असे मी त्यांना म्हणालो त्यावेळी श्री. खरबडे म्हणाले की, टाका प्रेमाने तेवढं काय होतं असे म्हणाल्याने मी 10,000/- रुपये ऍथ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम श्री. खरबडे यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली ती वेळ 15.18 वाजेची होती. श्री. खरबडे यांनी लाचेची रक्कम स्विकारताच मी सापळा पथकास लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजित इशारा केला असता तेथे पोलीस निरीक्षक श्री हरीदास डोळे हे त्यांचे सापळा पथकासह हजर आले त्यांनी श्री अर्जुन खरबडे यांना ताब्यात घेतले त्यांना सापळा पथकाचा परिचय देवून त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अर्जुन गंगाधर खरबडे वय- 44 वर्षे व्यवसाय नोकरी पद- ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत राहेगाव ता. वैजापुर जि.छत्रपती संभाजीनगर रा. मुळगाव दारेफळ ता. वसमत जि. हिंगोली ह. मु.

C/O घर नं. 2-S NO-188 म्हसोबानगर, हर्सुल छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यानंतर स्विकारलेल्या लाच रकमेबाबत पोलीस निरीक्षक, हरिदास डोळे यांनी मला व पंच क्र. 1 यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, श्री. अर्जुन खरबडे यांनी लाचेची रक्कम त्यांचे पँटचे समोरील डावे बाजुचे खिशात ठेवली असल्याचे सांगितले. सदर लाचेची रक्कम 10,000/- रुपये 500/- रुपये दराच्या वीस चलनी नोटा असे पोलीस निरीक्षक, हरिदास डोळे

सांगितल्यावरुन पंच क्रं. 2 यांनी काढुन त्यांच्याकडे ठेवल्या.
दिनांक 28/06/2024 रोजी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजने अंतर्गत सन-2023-24 या आर्थिक वर्षातील माझे व इतर 06 लाभार्थी असे एकुण 7 लाभार्थीचे मंजुर गायगोठ्याचे मोजमाप पुस्तिकेवर नोंद केल्याचा मोबदला म्हणुन श्री.खरबडे यांनी प्रथम प्रत्येकी 5000/-रुपये मोजमाप पुस्तीका (एम बी) प्रमाणे व त्यानंतर तडजोडी अंती 3000/- रुपये मोजमाप पुस्तीका (एम बी) प्रमाणे असे एकुण 21000/- हजार रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 10,000/-रुपये स्विकारण्याचे मान्य करुन सदर लाच रक्कम स्वत पंचायत समिती कार्यालय वैजापूर समोरील रोडच्या पलीकडच्या फुटपाथवरील श्री.साईयश पान मंदीर या पानटपरीचे बाजुला पंचासमक्ष 15.18 वाजेच्या सुमारास स्विकारले आहेत. म्हणुन माझी वरील लोकसेवक श्री. अर्जुन खरबडे यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.
माझी वरीलप्रमाणे फिर्यादी माझ्या सांगण्याप्रमाणे संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून, ती मी वाचुन पाहीली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Shamsundar Ramchandra Kauthale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

State
P.S

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (**नाव**):** Shamsundar Ramch

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं.**):** PI

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे वैजापुर
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण